# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 15.05.2025** **वार-गुरुवार**

---

**मुख्यमंत्री**

राष्ट्र प्रथम ही भूमिका घेत पाकिस्तान आणि तुर्कीए विरोधात ठामपणे उभ्या ठाकलेले पुण्यातील व्यापारी, अभिनंदनास पात्र आहेत, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावाच्या पार्श्वभूमीवर तुर्कीएनं पाकिस्तानला समर्थन दिलं; त्यानंतर पुण्यातील व्यापाऱ्यांनी तुर्कीएच्या सफरचंदांवर बहिष्कार टाकला असून अनेक व्यापाऱ्यांना धमक्या येत आहेत. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री आज पुण्यात माध्यमांशी बोलत होते. व्यापऱ्यांना संरक्षण दिलं जाईल, त्यांनी घाबरण्याची गरज नाही, असं आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं.

**मुख्यमंत्री यशदा**

महापालिका आयुक्त आणि नगरपरिषद मुख्याधिकारी यांची दोन दिवसांची कार्यशाळा पुण्यात यशदा इथं सुरू आहे. या कार्यशाळेलाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. राज्यात प्रशासन स्तरावर सुधारणा व्हाव्यात यासाठी ई गव्हर्नन्सचा वापर वाढवण आवश्यक आहे; याकरता उच्चस्तरीय प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कार्यशाळा होत आहेत, दीडशे दिवसांचा विकास कार्यक्रमाही राबवण्यात येणार आहे, असंही त्यांनी यावेळी नमूद केलं. राज्यातील महापालिकेच्या निवडणुका वेळेत घेण्याचा प्रयत्न करू; महाराष्ट्र निवडणूक आयोगानेही तयारी केली आहे, असंही फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

**नागरिक संरक्षण दल**

पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार 7 मे ते 14 मे या कालावधीमध्ये पुणे, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील नागरी संरक्षण दलाच्या कार्यालयांनी OP ABHYAS या उपक्रमा अंतर्गत युद्ध सज्जतेचा सराव घेण्यात आला. या प्रात्यक्षिकांमध्ये सामान्य नागरिकांना प्रथमोपचार, अग्निशमन, अग्निसुरक्षा आणि सायरनचे विविध प्रकारचे कॉल्स याबद्दल प्रशिक्षण देण्यात आलं.

6 हजाराच्यावर नागरी संरक्षण स्वयंसेवक, होमगार्ड, पोलीस दल, एनसीसी, एनएसएस, आरोग्य विभाग आणि प्रशासकीय विभागातील अधिकाऱ्यांनी यात भाग घेतला. युद्धजन्य परिस्थिती आणि विविध आपत्तीना सामोरे जाण्यासाठी अन्य नागरिकांनीही नागरिक संरक्षण दलामध्ये सामील होऊन राष्ट्रीय कार्यात योगदान द्यावं असं आवाहन करण्यात आलं आहे.

**मिळकत कर**

पुणे जिल्ह्यात आता नागरिकांच्या घराच्या दरवाज्यावर लावण्यात येणा-या पाटयावर असलेल्या क्यूआर कोड वरून मिळकत कर भरता येणार आहे. भोर तालुक्यातील शिंदेवाडी भोर तालुक्यातील शिंदेवाडी आणि कासूर्डी या  दोन्ही गावात डिजिटल पाटया लावण्यात आल्या आहेत. या दोन गावातील प्रयोग यशस्वी झाला आहे. जिल्हयात हजारपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावातील घरावर पहिल्या टप्प्यात डिजिटल पाटया लावण्यात येणार आहेत. ग्रामीण भागात आतापर्यंत मिळकत कर भरण्यासाठी ग्रामपंचायतीत जाऊनच भरावा लागत होता. मात्र आता क्यूआर कोडमुळे घरबसल्या मिळकत कर भरता येणार आहे. शिंदेवादीच्या डिजिटल पाटीची संकल्पना आता संपूर्ण जिल्हयात राबविण्याचा मानस असल्याचं पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी सांगितलं.

**पशुसंवर्धन**

राज्याच्या सर्व विभागांमध्ये पशुवैद्यकीय सेवांचा योग्य समतोल, तसंच बदल्यांची प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि न्याय्य पद्धतीने पार पडावी, या उद्देशाने पशुसंवर्धन विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचललं आहे. पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी पशुधन विकास अधिकारी गट-अ आणि  सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन गट-अ या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या समुपदेशनाच्या माध्यमातून करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे केवळ बदल्यांची प्रक्रिया पारदर्शक होणार नाही, तर विभागात कार्यरत अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षमते यानुसार योग्य ठिकाणी नियुक्ती मिळण्यास मदत होणार आहे, असं पशुसंवर्धन आयुक्तालयाचे उपायुक्त डॉ. प्रशांत भड यांनी म्हटलं आहे.

**प्रदर्शन**

युनिव्हर्सल ट्राइब्स आणि दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री यांनी संयुक्तपणे पुण्यात आदी संस्कृती महोत्सव 2025 या प्रदर्शनाचं आयोजन  केलं आहे. आदिवासी समाजाच्या कला, संस्कृती आणि विविध वस्तूंच्या या प्रदर्शनाचं उद्घाटन दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स एंड इंडस्ट्री चे संस्थापक मिलिंद कांबळे यांच्या हस्ते करण्यात आलं. हा महोत्सव 17 मे पर्यंत गणेश कला क्रीडा मंच इथं सुरू असून विविध राज्यांतील सुमारे 20 हून अधिक आदिवासी जमाती या महोत्सवात सहभागी झाल्या आहेत.

**महावितरण**
महावितरण कंपनीकडून सगळीकडे जुने मीटर काढून नवीन स्मार्ट मीटर लावण्याचा बेकायदा धडाका सुरू असल्याचा आरोप अखिल भारतीय ग्राहक पंचायतीनं केला आहे. कोणत्याही वीजकंपनीनं त्यांच्या कायमस्वरूपी वीज पुरवठा असणाऱ्या कोणत्याही वीजग्राहकावर स्मार्ट वीज मीटर बसविण्याच्या बाबतीत एकतर्फी धोरणात्मक निर्णयाची भीती घालून ग्राहकांना नको असलेले नवीन स्मार्ट मीटर बसवायचा प्रयत्न केल्यास त्याला टोकाचा विरोध करून हाणून पाडण्यात येईल, असा इशारा ग्राहक पंचायतीचे मध्य महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष बाळासाहेब औटी यांनी महावितरण कंपनी आणि राज्य सरकारला दिला आहे. पुणे जिल्ह्यात अनेक तालुक्यातून शेकडो ग्राहकांच्या तक्रारी ग्राहक पंचायतीकडे आल्यानंतर पुण्यात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत औटी बोलत होते.

**हवामान**
पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 36 अंश सेल्सिअस तर किमान तापमान 23 पूर्णांक 8 अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्या कमाल तापमानात काहीशी वाढ होण्याची शक्यता असून दुपारनंतर हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांतमधे. नमस्कार.**